**कृषी विभाग, महाराष्ट्र शासन**
**ई-निविदा सुचना**

कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्यावतीने योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने **महाराष्ट्र राज्यातील शेतक-यांसाठी विदेश अभ्यास दौरे** आयोजित करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. खालील विविध देशात कृषि विषयक अद्ययावत तंत्रज्ञान व पीकपद्धती अभ्यासण्यासाठी अभ्यास दौरे आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | आभ्यास दौ-यातील समाविष्ठ देश | शेतकरी संख्या | दौरा खर्चामध्ये अंतर्भुत बाबी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | चीन<br>(७ दिवस व ६ रात्री) | किमान ४० ते ४५ | १) अभ्यास दौ-याचा कालावधी रकाना क्र.२ मध्ये दर्शविल्यानुसार असेल.<br>२) अंतर्गत विमान प्रवास खर्चासह पुणे ते पुणे (इकॉनॉमी क्लास),<br>३) एअरपोर्ट-हॉटेल-एअरपोर्ट व स्थानिक वातानुकुलीत लक्झरीने बस प्रवास,<br>४) अभ्यास दौ-यात प्रस्तावित कृषि विषयक स्थळांना भेटीचा कार्यक्रम.<br>५) निवास व्यवस्था (ट्वीन शेअरींग बेसीस)<br>६) ब्रेकफास्ट, लंच व डिनर (प्राधान्याने भारतीय पध्दतीचे)<br>७) व्यवसायीक/उद्योजक मराठी भाषिक अनुभवी मार्गदर्शक/अनुवादक असावा.<br>८) पोर्टरेज, व्हीसा इमिग्रेशन क्लीअरन्स इ. खर्च<br>९) सर्व एअरपोर्ट व संबंधित देशातील शासकीय व इतर कर, ओव्हरसीज् मेडीकल इन्शुरन्स इ. खर्च<br>१०) टीप्स, प्रशिक्षण/संशोधन संस्था व प्रदर्शने भेटीसाठी येणारा किरकोळ खर्च. | प्रत्येक दौ-यासाठी स्वतंत्र निविदा भरणे आवश्यक आहे.<br>-परकीय चलनामध्ये खर्च करावा लागल्यास तसा उल्लेख करावा.<br>-दौरा कार्यक्रम निविदा सुचनेत प्रस्तावित केल्यानुसार असावा. |

सदर ई-निविदा प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राहील. वरील कामाची निविदा व निविदेच्या अटी शर्ती **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा सूचना क्रमांक | Shemase/16-17/CR-05/China-Tender/ Vipra 6, Dated - 30/6/2016 |
| २ | निविदा प्रसिद्धी दिनांक | ०४/७/२०१६ |
| ३ | निविदा डाऊनलोड सुरुवात दिनांक | ०४/७/२०१६, सकाळी ११.०० वाजता |
| ४ | निविदा पूर्व चर्चा बैठक | १२/७/२०१६, दुपारी १२.०० वाजता |
| ५ | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक | १९/७/२०१६, दुपारी ०५.०० वाजेपर्यंत |
| ६ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | २०/७/२०१६, सकाळी ११.०० वाजता |
| ७ | निविदा उघडण्याचे ठिकाण | कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे-४११००५ |

काही कारणास्तव निविदा मंजुर करणे किंवा नाकारणे तसेच काही अपरिहार्य कारणास्तव अभ्यास दौरा रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार कृषि आयुक्तालय स्तरावर राखून ठेवण्यात आलेले आहेत. निविदा फॉर्मची **किंमत रु.१०,०००/- प्रती निविदा** फॉर्म (नापरतावा) व इसारा **रक्कम रु. १००,०००/- प्रती निविदा** ऑनलाइन पद्धतिने जमा करणे अनिवार्य आहे.

**स्वाक्षरीत/-**
**कृषि संचालक (वि. व प्र.)**
**कृषि आयुक्तालय, म.राज्य, पुणे**